# बोर्ड प्रश्नपत्रिका : फेब्रुवारी २०२४

## राज्यशास्त्र

**वेळः ३ तास** **एकूण गुण : ८०**

**सूचना :**

(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) उजवीकडे दिलेल्या संख्या पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक नव्या प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पानावर करावा.

**प्र.१. (अ) कंसांतील योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (५) [२०]

(१) आज युरोपीय संघातील _______ देश शेंगेन प्रदेशाचा भाग आहेत.
(२०, २२, ३०, ३२)

(२) खाजगी व सार्वजनिक उद्योग समाविष्ट होणाऱ्या अर्थव्यवस्थेला _______ अर्थव्यवस्था असे म्हणतात.
(मिश्र, साम्यवादी, समाजवादी, भांडवलशाहीवादी)

(३) संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक पर्यावरण आणि विकास आयोगाची स्थापना _______ वर्षी केली..
(१९६७, १९८३, १९९०, २००१)

(४) आज नियोजन आयोगाची जागा _______ आयोगाने घेतली आहे.
(निवडणूक, आर्थिक, सामाजिक, नीती)

(५) ब्रिक्स संघटनेत २०१० साली _______ या देशाचा समावेश झाला.
(जपान, भूतान, दक्षिण आफ्रिका, नेपाळ)

**(ब) खालील प्रत्येक गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून पुन्हा लिहा.** (३)

(१) (अ) चीन व भारताचा वाढता प्रभाव – बहुध्रुवीय व्यवस्थेचा उदय
(ब) वांशिक राष्ट्रवाद – स्वयंनिर्णयाचे तत्त्व
(क) युरोपीय संघातील चलन – डॉलर

(२) (अ) भारतात प्रौढमताधिकार – २० वर्षे पूर्ण
(ब) महिला सक्षमीकरणाचे धारेण – २००१
(क) भारताचा नियोजन आयोग – १९५०

(३) (अ) कामगार संघटना – राजकीय संस्था
(ब) जन्म-मृत्यूचा दाखला देणे – प्रशासकीय यंत्रणा
(क) आंतरराष्ट्रीय संस्था – आशियाई विकास बँक

Target Publications

**(क) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.** (४)

(१) आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधात वाढ झाली ; कारण ........
- (अ) जागतिकीकरणाचा प्रसार
- (ब) परदेशातील भांडवलाची उपलब्धता.
- (क) मोबाईल संयंत्रणेचा प्रसार

(२) भारतात नियोजन आयोगाची स्थापना करण्यात आली ; कारण...
- (अ) शेती उत्पादनात वाढ करणे.
- (ब) उद्योगधंद्याचा विकास करणे.
- (क) जनतेचे राहणीमान सुधारणे व सर्वांगीण विकास घडवून आणणे.

(३) युनिलिव्हर ही एक ट्रान्स-नॅशनल कंपनी आहे ; कारण.....
- (अ) ती कोणत्याही एका राष्ट्राला बांधील नाही.
- (ब) ती सर्व क्षेत्रात कार्य करते.
- (क) ती सर्व देशांत कार्यरत आहे.

(४) प्रादेशिकवादाचा विकास झाला ; कारण .......
- (अ) रशियाचे विभाजन झाले.
- (ब) बहुध्रुवीय जागतिक व्यवस्था अस्तित्वात आली.
- (क) अमेरिकेचे वर्चस्व संपुष्टात आले.

**(ड) दिलेल्या विधानांसाठी समर्पक संकल्पना लिहा.** (४)

(१) जेव्हा एक देश इतर देशांवर लष्करी बळाच्या वापराशिवाय प्रभाव पाडतो .......

(२) जास्त उत्पन्न देणाऱ्या जातीच्या बियाणांचा विकास, सिंचनपद्धतीचा विस्तार करणे .......

(३) शासकीय खात्यातील अधिकाऱ्यांच्या विरोधातील तक्रारीची चौकशी करणारी व्यक्ती .......

(४) जगातील इतर देशांशी संबंध प्रस्थापित करणे.....

**(इ) गटात न बसणारा शब्द ओळखा व लिहा.** (४)

(१) लाल बहादूर शास्त्री, नरेंद्र मोदी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अटलबिहारी वाजपेयी.

(२) आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आशियाई विकास बँक, जागतिक बँक, महाराष्ट्र बँक

(३) हवामान बदल, जंगलतोड, प्रदूषण, राजकीय पक्ष.

(४) सार्कची सदस्य राष्ट्रे : भारत, नेपाळ, श्रीलंका, चीन.

**प्र.२. (अ) खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.** (४)[९]




Target Publications

(ब) **खालील नकाशाचे निरीक्षण करून पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.** (५)




(१) युरोपियन युनियनमधील युरोझोनचे सदस्य असलेल्या कोणत्याही तीन देशांची नावे लिहा. (३)

(२) युरोझोनमध्ये सहभागी नसलेल्या युरोपियन युनियनच्या कोणत्याही दोन देशांची नावे लिहा. (२)

**प्र.३. खालील विधाने 'बरोबर' की 'चूक' ते सकारण सांगा (कोणतेही पाच).** **[१०]**

(१) १९८० च्या दशकाला मानवतावादी हस्तक्षेपाचा सुवर्णकाळ म्हणतात.

(२) जागतिकीकरणाने बाजारपेठीय अर्थव्यवस्था ही संकल्पना जाणली.

(३) निजोजन आयोगाची निर्मिती कृषीविकासाला प्रोत्साहन देण्यासाठी झाली.

(४) सुशासनामध्ये नैसर्गिक संसाधनांचा कुशलतेने वापर केला जातो.

(५) भारतीय स्वांतत्र्य चळवळ राष्ट्रीय एकात्मतेस पोषक ठरली आहे.

(६) लोकायुक्त राजकीय कार्यकारी प्रमुखांविरोधात चौकशी करू शकतात.

(७) राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही आवश्यक आहे.

**प्र.४. खालील विधानांचा सहसंबंध स्पष्ट करा (कोणतेही तीन).** **[९]**

(१) आर्थिक हितसंबंध आणि व्यापारी गट

(२) भारत आणि आफ्रिका

(३) सुशासन आणि ई-प्रशासन

(४) गॅट आणि जागतिक व्यापार संघटना

(५) जागतिकीकरण आणि संस्कृती

Target Publications

**प्र.५. खालील विषयावर तुमचे मत २५ ते ३० शब्दांत मांडा (कोणतेही तीन).** **[१२]**

(१) पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज आहे.

(२) ई-प्रशासनामुळे शासकीय प्रक्रिया गतिमान झाली.

(३) हिंद महासागरात भारताची भूमिका.

(४) आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रादेशिकवाद.

(५) जागतिकीकरणाच्या सकारात्मक व नकारात्मक बाजू.

**प्र.६. खालील प्रश्नांची उत्तरे ८० ते १०० शब्दांत लिहा (कोणतेही दोन).** **[१०]**

(१) जागतिकीकरणाचे राजकीय क्षेत्रावर झालेले परिणाम स्पष्ट करा.

(२) महिला सक्षमीकरण म्हणजे काय ते सांगून त्यासाठी करण्यात आलेली उपाययोजना सांगा.

(३) राष्ट्रीय एकात्मता वाढीसाठी करण्यात आलेल्या संरचनात्मक तरतुदी स्पष्ट करा.

(४) समाजातील विविध घटकांचे हक्क सुरक्षित करणाऱ्या भारतातील विविध संस्था स्पष्ट करा.

**प्र.७. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा.** **[१०]**

(१) भारताच्या परराष्ट्र धोरणाची तत्त्वे स्पष्ट करा-

(अ) अलिप्ततावाद

(ब) सार्वभौमत्वाचा आणि प्रादेशिक एकात्मतेचा आदर

(क) अंतर्गत राज्य कारभारामध्ये ढवळाढवळ न करणे

(ड) शांततापूर्ण सहजीवन या तत्त्वाचा स्वीकार

(इ) आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये सहभाग

(२) आधुनिक काळात राज्याची भूमिका स्पष्ट करा-

(अ) शासन

(ब) आर्थिक प्रगती

(क) लोककल्याण

(ड) राष्ट्र उभारणी

(इ) शांतता व सुव्यवस्था

Target Publications